# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 308/2022 दिनांक : 10.08.2022

## 1)मो. सा. चोरी :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 04.08.2022 रोजी 19.15 वा. ते 21.20 वा. चे दरम्यान, **हिंगोली गेट, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा कंपनीची मो.सा. क्रं. एमएच–26/एजी–4698 किंमती 30,000/– रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी हरजिसिंघ कशमीरसिंघ भट, वय 29 वर्षे, व्यवसाय सेवादार रा. गेट नं. 1 गुरुव्दारा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 277/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1824 केंद्रे, मो.क्रं. 9970381047** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 08.08.2022 रोजी 02.30 वा. ते 07.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरा समोरुन विठ्ठलनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची बजाज पल्सर कंपनीची मो.सा. क्रं. एमएच–26/बीपी–7810 किंमती 40,000/– रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी वैभव श्रीनिवास धनकोट, वय 24 वर्षे, व्यवसाय वकील रा. विठ्ठलनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 281/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/81 बंडेवार, मो.क्रं. 9923103778** हे करीत आहेत.

**3)विमानतळ :–** दिनांक 22.07.2022 रोजी 21.30 वा. ते दिनांक 23.07.2022 रोजी 07.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरा समोरुन ताजनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पेलंडर प्लस कंपनीची मो.सा. क्रं. एमएच–26/एक्स–5918 किंमती 25,000/– रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शेख शफी शेख युसूफ, वय 40 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. ताजनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 280/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कुरुळेकर, मो.क्रं. 9923696704** हे करीत आहेत.

**4)विमानतळ :–** दिनांक 02.08.2022 रोजी चे 22.00 ते दिनांक 03.08.2022 रोजी चे 07.00 वा. चे दरम्यान, **रामनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो स्पेलंडर कंपनीची मो.सा. क्रं. एमएच–26/बीयु–3619 किंमती 50,000/– रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी राजु शंकर पारटवार, वय 33 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. रामनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 279/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/967 गायकवाड, मो.क्रं. 9529796606** हे करीत आहेत.

**5)धर्माबाद :–** दिनांक 06.08.2022 रोजी चे 23.30 वा. ते दिनांक 07.08.2022 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **बाळापुर फिर्यादीचे राहते घरासमोर मौजे बाळापुर ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची बजाज पल्सर कंपनीची मो.सा. क्रं. एमएच–26/सी.सी.–1071 किंमती 40,000/– रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी सुरेश मोतीराम डेबेकर, वय 29 वर्षे, व्यवसाय शेती रा. बाळापुर ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 190/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1928 स्वामी, मो.क्रं. 9823562983** हे करीत आहेत.

**6)नायगाव :–** दिनांक 06.08.2022 रोजी 21.00 वा. ते दिनांक 07.08.2022 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरासमोर मौजे कोलंबी ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपनीची मो.सा. क्रं. एमएच–26/एवाय–7913 किंमती 30,000/– रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी चंद्रकांत मारुती चिंतेवाड, वय 40 वर्षे, व्यवसाय हॉटेल चालक रा. कोलंबी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरन 123/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वाघमारे, मो.क्रं. 9096618241** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**हदगाव :–** दिनांक 10.08.2022 रोजी 01.00 वा. ते 04.00 वा. चे दरम्यान, **बसस्थानक परिसर हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा नालीचे दिवसभर काम करुन बी.एस.एन.एल. कार्यालय हदगाव येथे थांबला असता यातील बसस्थानक आवारात ठेवलेली अंदाजे 10 क्विंटल गजाळी किंमती 60,000/–रुपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी गौरव कल्याण सोनाळे, वय 20 वर्षे, व्यवसाय बांधकाम ठेकेदार रा. गायतोंड ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरन 250/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कदम, मो.क्रं. 7387500709** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**वजिराबाद :–** दिनांक. 08.08.2022 रोजी चे 21.45 वा. चे सुमारास, **महावीर चौक येथील रोडवर, नांदेड येथे,** यातील अनोळखी आरोपीने मोटार सायकलला कट का मारली या कारणावरुन वाद करुन फिर्यादीस शिवीगाळ केली व रॉडने उजव्या हातावर व डोक्यात मारुन गंभीर दुखापत केली तसेच लाथाबुक्याने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी किशन दिपकचंद रोडा, वय 22 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. सराफा गल्ली, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 275/2022 कलम 326,323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आगलावे, मो.क्रं. 8237703777** हे करीत आहेत.

## 4)फसवणुक :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 09.08.2022 रोजी, **लिटल कॉलर पब्लिक स्कुल मंत्रीनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीस तिचे मो.क्रं. वर व्हॉट्सअप नंबर वर लिंक पाठवुन सदर फिर्यादीने लिंकवर क्लिक केली असता तिचे दहा रुपये डेबीट न झाल्याने आरोपीस hi म्हणुन मॅसेज पाठविला त्यावेळी आरोपीने Base.apk म्हणुन ॲप प्ले स्टोअर मधुन ॲप डाऊनलोड करण्यास सांगुन सांगितलेले नंबर त्या ॲप मध्ये टाकुन सदर ॲप मोबाईल मधुन काढुन टाकण्यास सांगुन फिर्यादीचे बॅकचे वेगवेगळया खात्यामधुन एकुण 99,997/–रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करुन सदर आरोपीने फिर्यादीची ऑनलाईन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी आश्विनी अमित कुलकर्णी, वय 39 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी, रा. सरपंचनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 282/2022 कलम 420 भादवि सह कलम 66 डी आय.टी. ॲक्ट कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री आडे, मो.नं. 9552082544** हे करीत आहेत.

**2)भोकर :–** दिनांक 10.08.2022 रोजी 06.00 वा चे सुमारास, **मौजे खरबी शिवार ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे ट्रक चालक असून ठरल्याप्रमाणे मालकाचा माल खुर्च्या 1337 नग 175 रुपये दराप्रमाणे एकुण 2,13,975/– रुपयाचा यातील आरोपीकडे पोच करण्यासाठी आला असता यातील आरोपीतांनी संगणमत करुन सर्व माल उतरवून घेवून खुर्च्याचे पैसे न देता आणून देतो म्हणुन पैसे दिले नाही फसवणुक करुन निघुन गेले. वगैरे **फिर्यादी नागराजु भिक्षापती वनमा, वय 29 वर्षे, व्यवसाय ट्रक चालक रा. मल्लिकार्जुन परीजादगुडा पाण्याच्या टाकी जवळ गोडपल ता. गटकेश्वर जि. मेंडचल राज्य तेलंगना** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 272/2022 कलम 420,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/2401 जाधव, मो.नं. 9850493110** हे करीत आहेत.

## 5)आत्महत्येस प्रवृत केले :–

**अर्धापुर :–**दिनांक 16.03.2022 रोजी चे 10.00 ते दि. 04.08.2022 चे दरम्यान वेळ नक्की नाही, **मौ. कोंडा केरबा लक्ष्मण दैत्य यांचे शेतात लिंबाच्या झाडाला ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे हरी कृष्णाजी जाधव, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. कोंढा ता. अर्धापुर जि. नांदेड,** यांचे पत्नीने आरोपीकडुन सहा लाख रूपये घेऊन व्यवसाय केला. कांही कालांतरा नंतर आरोपीतांनी संगणमत करून फोनवरून मयतास मोबाईलवर फोन करून व्याजाचे पैसे परत कर म्हणुन तगादा लावुन पैसे दिले नाही तर तुला खतम करून टाकतो म्हणुन धमकी दिली. व मयताने दिनांक 20.07.2022 रोजी आरोपीस यांच्याकडे व्याजासह पैसे परत केले व आरोपी हे दिनांक 02.08.2022 रोजी 08.00 ते 08.30 वा. चे दरम्यान फिर्यादीचे घरी येवुन तिचे मयत नवऱ्यास राहिलेले पैसे दे नाहीतर तुला खत्म करून टाकतो अशी धमकी दिली. तेंव्हा यातील मयत व्यक्तीने आरोपीतांच्या त्रासाला कंठाळुन गळफास घेवुन आत्महत्या केला. यातील नमुद आरोपीतांनी मयतास आत्महत्या करणेस प्रवृत केले.. वगैर **फिर्यादी श्रीमती कविता हरी जाधव, वय 43 वर्षे, व्यवसाय घरकाम व शेतीकाम रा. कोंडा ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 227/2022 कलम 306, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री तयब, मो.नं. 9765444306** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**1)मुखेड :–** दिनांक 31.05.2008 ते दि.10.08.2022 चे दरम्यान, **मौ. राठोडवाडी तांडा ता. जळकोट जि. लातुर ह. मु. फुलेनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु वांझोटी आहेस. तुला मुलबाळ होत नाही असे म्हणुन फिर्यादी बाईस उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ व मारहाण करून केली. त्यानंतर फिर्यादीस एक मुलगा व एक मुलगी झाल्यानंतर पती व सासरचे लोकांनी फिर्यादी बाईस तुला नांदायचे असेल तर तुझ्या माहरहुन दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन तिचा शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 32 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 236/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1793 राठोड, मो.क्रं. 8805957440** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 11.02.2011 ते दि. 24.12.2021 रोजी चे 24.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी गोविंद कॉलनी सिडको नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस पिठाची गिरणी टाकण्यसाठी दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन तिला शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन तिचा शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 28 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 488/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1230 गव्हाणकर, मो.क्रं. 9923494694** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 10.08.2022 रोजी चे 01.30 वा. चे सुमारास, **जुने सिटी बसस्थानक नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्यासाठी ओलसावलीत अंधारात लपुन बिना परवाना बेकायदेशिररित्या खंजर ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1210, अफजलखान पि. महेबुबखान पठाण ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 276/2022 कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/1824 केंद्रे, मो.क्र. 8237703777** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 10.08.2022 रोजी चे 15.10 वा. चे सुमारास, **बोरवन फॅक्ट्री पवार हॉस्पीटल समोर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या आपले ताब्यात एक गावठी पिस्टल व 10 जिवंत काडतुस एक मॅग्झीन किंमती 51,000/–रूपयाचा मुद्येमाल बेकायदेशिररित्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1098, गजानन दि. किडे, ने. पोस्टे वजिराबाद नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 280/2022 कलम 3/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री चव्हाण, मो.क्र. 9881429988** करीत आहेत.

**3)वजिराबाद :–** दिनांक 10.08.2022 रोजी चे 11.30 वा. चे सुमारास, **डॉ. खुरसाळे हॉस्पीटल समोर रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या आपले ताब्यात एक पिस्टल व 2 जिवंत काडतुस एक किंमती 25,200/–रूपयाचा मुद्येमाल बेकायदेशिररित्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री संजय धोंडीराम निलपत्रेवार, ने. पोस्टे वजिराबाद नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 278/2022 कलम 3/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री मंठाळे, मो.क्र. 8237703777** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**धर्माबाद :–** दिनांक 10.08.2022 रोजी चे 19.10 वा. चे सुमारास, **रामपुर शिवारातील कस्तुरबा गांधी शाळेचे पाठीमागे लिंबाचे झाडाखाली धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 6500/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/अमित गौसोद्यीन सय्यद, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 192/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री कत्ते, मो.क्र. 9764574333** हे करीत आहेत.

## 9)हुक्का पार्लर :–

**इतवारा :–** दिनांक 09.08.2022 रोजी चे 21.20 वा. चे सुमारास, **फुरखान यांचे टीनपत्रे सेड मध्ये आयटीआय समोर माळटेकडी रोड नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररित्या येणाऱ्या ग्राहकांना तंबाखुजन्य हुक्का फ्लेवरर्सची विक्री केली तसेच खोलीतील किचन मध्ये शेगडीवरील पेटत्या निखाऱ्यामुळे आस्थापनाना आग लागण्याची व त्यामुळे मानवी जिवनास धोका होण्याची कृत्य केले. तसेच हुक्का ओढत असतांना मिळुन आले. त्यांचेकडुन हुक्का पार्लरचे ओढण्याचे साहित्य व साधन किंमती 5100/–रूपयाचे जप्त करण्यात आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/436, एकनाथ सखाराम मोकले, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 207/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/1821 रसुल शेख, मो.क्र. 02462–236510** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र. 309 / 2022  दिनांक : 10.08.2022

नांदेड पोलीस दलातर्फे "स्वातत्र्याचा अमृत महोत्सव" निमित्ताने शक्ती रॅलीचे आयोजन...

"स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव" निमीत्ताने महिला सुरक्षा जनजागृती करणेसाठी गर्दीचे ठिकाणी, शाळा, कॉलेज मधील मुलींना अडचणीच्या वेळी तात्काळ मदत होण्यासाठी तसेच शहरामध्ये खाजगी शिकवणी व ईतर गर्दीच्या ठिकाणी महिला व मुलींसाठी तात्काळ मदत करण्यासाठी व परिणाम कारक पेट्रोलींग करण्यासाठी हिरो होंडा मो सायकलचे संचालक **श्री कोठारे** यांच्या प्रयत्नाने नांदेड पोलीस घटकाला हिरो होंडा कंपणीच्या वीस टु व्हीलर देण्यात आल्या हात्या. **मा. श्री निसार तांबोळी साहेब**, पोलीस उप महानिरक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, **मा. श्री प्रमोद शेवाळे**, पोलीस अधिक्षक,नांदेड यांचे संकल्पनेतुन शक्ती मोर्बाईलची निर्मीती करण्यात आली.

आज दिनांक 11 ऑगष्ट, 2022 रोजी 10.00 वा. शक्ती रॅलीचे उदघाटन **मा. सौ. जयश्री पावडे**, महापौर ना.वा.श.म.न.पा. नांदेड यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी **मा. सौ. वर्षा ठाकुर**, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड, **डॉ. सुनिल लहाने**, आयुक्त, नां. वा. श. मनपा नांदेड, **मा. श्री प्रमोद शेवाळे**, पोलीस अधिक्षक, नांदेड, **मा. श्री निलेश मोरे**, अपर पोलीस अधिक्षक,नांदेड, **मा. श्रीमती डॉ. अश्विनी जगताप**, पोलीस उप अधिक्षक (मु), नांदेड, **श्री कोठारे**, हिरो होंडा मोटार सायकलचे संचालक हजर होते. सदर शक्ती मोबाईलचे शहरामध्ये पोलीस अधिक्षक कार्यालय ते राज कॉर्नर परत पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड असे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर शक्ती रॅलीचे प्रतिनिधीत्व मपोउपनि **प्रियंका आघाव, गंगुताई नरतावार** व पोलीस अंमलदार **रंजना शेळके, क्रांती बंदखडके, शुभांगी जाधव, रेखा चक्रधर, पडगीलवार, पदमीन जाधव, सुशिला जानगेवार, सुनिता मलचापुरे, सुनिता मैलवाड, वंदना घुले, बालिका कंधारे, बालिका बर्डे, ज्योती गायकवाड, उज्वला सदावर्ते, सपना पाटील, सुषमा लोखंडे, संतोषी मल्लेवाड, रेणुका पवार, पदमा नलगोंडे, सिमा वच्छेवार, क्रांती गायकवाड, सविता शेळके, वर्षा पवार, कोमल राठोड** तसेच दामीनी पथकाचे मपोउपनि **प्रनिता बाभळे** महिला पोलीस अंमलदार **लोपमुद्रा आनेराव, वैशाली कुलथे, शितल पौळ** व चालक **राजकुमार कोडगिरे** यांनी भाग घेतला होता.

सदर कार्यक्रमास **श्री व्दारकास चिखलीकर**, पोनि स्थागुशा, **श्री प्रशांत देशपांडे**, जिवीशा, **श्री माणिक बेद्रे**, आ.गु.शा., तसेच इतर अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने हजर होते सदर कार्यक्रमाचे आयोजन रापोनि **श्री विजय धोंडगे**, पोनि **श्री अनिल चोरमले**, पोलीस कल्याण विभाग नांदेड, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, **श्रीमती एस.एम.कलेटवाड**, सपोनि, **श्रीमती कमल शिंदे**, पोउपनि, **श्रीमती प्रियंका आघाव, श्रीमती स्नेहा पिंपरखेडे**, पोउपनि **शेरखान पठाण**, हे हजर होते. तसेच सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सपोउपनि **श्री विठ्ठल कत्ते** यांनी केले.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड




हर घर
स्वातंत्र्याचा


घर